REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# बालसाहित्य स्वरूप आणि अपेक्षा

पाटील विजया पांडुरंग
पी.एच.डी.संशोधक विद्यार्थीनी , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

## प्रास्ताविक -



बदलत्या कालचक्राप्रमाणे नवनव्या शोधाची परिक्रमा अव्याहतपणे चालू असलेली दिसते. जूने आणि नवे यांचे मिश्रण करून वेगळं काही दाखवण्याचा प्रयत्नही दिसून येतो. प्रत्येक सेंकदाला नवीन ऐकण्याची पाहण्याची हौसही पहावयास मिळते. नवीन बदल आत्मसात करून समाज अंर्तबाहय बदलत वेगाने पुढे जात असताना विशिष्ट काळाचा ठसा समाजजीवनावर उमटत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येते. एकूण समाज जीवनाच्या परिघात केंद्रबिंदू असणारा घटक हा मूल आहे. मानवी संस्कृतीने आपल्या बुद्धीच्या जोरावर अनेक शोध लावले आणि समाजव्यवसथेच्या गरजेनुसार किंवा सोयीप्रमाणे बदल केले. पूर्वापार चालत आलेल्या शिक्षणपद्धतीपासून आजच्या ज्ञानरचनावादी शिक्षणप्रणाली पर्यंत वेगवेगळया टप्प्यामध्ये संशोधन झाले आहे. पाठयपुस्तकापलीकडे जावून अत्यंत आनंददायी वातावरणात मुलांना शिक्षणांच्या उदि्ष्ठापर्यंत घेवून जाणे. मुलांच्या मनात प्रचंड ऊर्जा असते. त्या ऊर्जेला सकारात्मक वाट करून देणे मुलांच्या व्यक्तिमत्वाचा अंतबाहर्य सर्वांगिण विकास साधणे. त्यांच्यामध्ये असणाऱ्या सुप्तकलागुणांना वाव देणे. त्यांच्या मनातील आंदोलने बोलती करणे. २१ व्या शतकातील आव्हांनाना सामोर जाण्यासाठी जेवढी त्याला तंत्रज्ञानाची गरज आहे. त्याहून अधिकतम गरज उमलत्या वयातील मुलांच्या भावनिक आव्हांनाना सामोरे जाण्यासाठी, समाज उभारणीसाठी सुजान व सजग बालकाची आवश्यकता आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे होवून गेली. लोकशाहीच्या मार्गाने प्रगतिपथावर असलेला देश 'मेक इन इंडिया' ची वाटचाल करत आहे. बालसाहित्य लेखन ही समाजिक जाणीव असून मूलांच्या भावनेला साध्या सोप्या भाषेत व्यक्त करणे. त्याचबरोबर जीवनविषयक उच्च ध्येयाचे आणि चारित्र्यसंवर्धन, शौर्यता, औदार्यता, देशप्रिती, सहानुपरकभूती इ. गुणाचे संस्करण करणे. आपल्यापैकी अनेक जणांचे बालपण हे नात्यातील अनेकविध असणाऱ्या पदरांनी त्याच्यांकडून सांगोवांगी झालेल्या कथाकहाण्यांनी समृद्ध झाले आहे. गोष्टीतून लहानग्यांना होत जाणारी भाषेची ओळख, पुस्तके वाचून समृद्ध होणारी भाषिक क्षमता व त्या अनुषंगाने झालेली ज्ञानाधिष्ठित कौशल्य कुशल मनुष्यबळ निर्मिती होत असेल पण संवेदनशील समाज हाच सुसंस्कृत आणि प्रगत समाज असतो.

## बालसाहित्याचे स्वरूप.

मराठी बालसाहित्याचा लिखित प्रारंभ एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला झालेला दिसतो. तरी एकूण मराठी साहित्यविश्वाची सुरूवात मुद्रित बालसाहित्याने केली आहे. मुद्रण कलेच्या आरंभीचे साहित्य हे अनेकविध होते. त्याचा प्रसार आणि प्रचार पाठांतराने आणि कथनपद्धतीने झालेला दिसतो. कथा, कहाण्या, ओव्या, पुराणातील संदर्भ, शुरवीरांच्या गाथा, लोकसाहित्यातील गोष्टींनी हे साहित्य रंजक ठरलेले दिसते. साहित्य हे मुलांच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असते. साहित्य आणि जीवन हे अभिन्न आहेत. मानवी जीवनातील विविध नात्यांचे, घटनांचे, प्रसंगाचे, अनुभवांचे प्रकटीकरण साहित्य महत्वाचे ठरते. लेखकाचा लेखनकाळ व बालवाचकाचा काळ यामध्ये काळाची तफावत असेल तर दोघांच्या अनुभवविश्वामध्ये कालिकदृष्टया अंतर पडते. व ती साहित्यकृती बालकासाठी निरूपयोगी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. बालसाहित्याला मौखिक आणि लिखित परंपरा लाभली असून या साहित्याचे विविध प्रवाह वयोगटाप्रमाणे वृत्ती.प्रवृत्तीनुसार, बालांच्या मानसिकतेचा विचार करून गुणाची प्रेरणा

LBP PUBLICATION

देणारे साहित्य कथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्र, अनुवादित इ. रचनाप्रकारानुसार आढळतात. मराठी बालसाहित्यातील 'बालबोधमुक्तावली' हे मराठीतील मुद्रित स्वरूपातील पहिले पुस्तक होय. लीलावती भागवत यांनी मराठी बालवाङ्मयाला 'खुणेचा दगड' म्हटले आहे. मुद्रणसंस्कृतीने बोधपर, उपदेशपर, चातुर्यपर अशा स्वरूपाचे बालसाहित्य आणले. आरंभापासून ते सानेगुरूजी पर्यंत बौद्धिक, भावनिक, मानसिक वाढीचा फारसा विचार न करता बोधमृत पाजणे हा हेतू होता. सानेगुरूजींनी बालकाला संस्काराचे जे बाळकडू दिले ते मराठी साहित्यात अत्यंत महत्त्वाचे होते. विशिष्ट दृष्टी, विशिष्ट वयोगटातील बालकासमोर ठेवून त्यांच्या जडणघडणीसाठी क ाही देता येईल काय ? हा विचार सानेगुरूजींच्या रूपाने समोर येतो. तेव्हा बालसाहित्यातील एक 'दिपस्तंभ' म्हणून बालसाहित्याकडे पाहिले जाते. वयोगटातील बालसाहित्य ते ही विविध वाङ्मय प्रकारागणिक या काळात आले. बालपण व बाल.बालिका हे मानवी जीवनाचे व समाजवास्तवाचे, समाजनिर्मित व व्यक्तिनिर्मित चिरतंन घटक आहेत.

### बालसाहित्याची व्याख्या.

१) चार ते सोळा वर्षे वयाच्या मुलांच्या बौद्धिक आकलनाच्या आवाक्यात येवू शकणारे व त्यांना वाचनीय वाटणारे वाङ्मय म्हणजे बालवाङ्मय असे म्हणता येई.'[१]

२) जे साहित्य बालांच्या आवडत्या रसांनी भरलेले असते ते साहित्य म्हणजे बालसाहित्य होय.'[२]

### बालसाहित्य निर्मितीचे प्रयोजन.

बालसाहित्याचा मुख्य हेतू निखळ आनंद, मनोरंजन, सौंदर्यनिर्मिती आहे. असे असले तरी मनोरंजन म्हणजे वेळ काढूपणा नसून बालकाला जीवन जगण्यासाठी परिपक्व करणे. बदलत्या जीवनाचे पैलू त्याच्यासमोर ठेवून बालकाचा आवाज त्याचे सत्व त्यातून प्रकट करणे. 'प्रौढांचे वाङ्मय आणि बालवाङ्मय यांचे अंतिम श्रेष्ठत्व ठरविण्याच्या कसोटया भिन्न नाहीत. कारण मुलत: कोणतेही लेखन हे सर्जनशील स्वरूपाचे असते. ते लेखन म्हणजे एक अनुभूति असते अशी नितळ अनुभूति आपली स्वत:ची आकृती घेवूनच प्रकट होते.'[३] यावरून बागूल यांनी वास्तव जीवनावर प्रकाश टाकता मानवी जीवनातील स्थित्यंतरे अधोरेखित करत 'स्व'ला प्रकट करताना परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी 'स्व' प्रयत्नाने ती बदलता येते. अनुकूल करता येते ही निश्चिती साहित्यातून मिळावी हेच साहित्यनिर्मितचे उद्दिष्ट व्यक्त करतात.

### बालसाहित्याची परंपरा.

बालसाहित्याचा प्रारंभबिंदू मौखिक, कथन पद्धतीने झाला आहे. आजीच्या गोष्टी, आईने बाळाला रिझवण्यासाठी गायीलेली गीते ही बालवाङ्मयाची पूर्व बालवाङ्मयाची पुर्वपिठीका मानवी लागेल, पाश्चात्य देशात पंधराव्या शतकात बालसाहित्याचा प्रारंभ झाला. अठराव्या शतकामध्ये एक स्वतंत्र साहित्यप्रकार म्हणून विचार होवू लागला. महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मुद्रणसंस्था आल्या आणि काही निवडक प्रौढ वाङ्मयापैकी बालांसाठी उपयुक्त पुस्तकांचे संस्करण केले गेले. उदा.पंचतंत्र, कथासाहित्या सागर, रामायण अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी इ.होत. हरी नारायण आपटे, सानेगुरूजी, भा.रा. भागवत, अमरेन्द्र गाडगीळ इ. काही लेखकांनी पाश्चात्य कादंबरीऱ्याचे अनुवाद करून बालसाहित्याचे दालन समृद्ध केले.

### बालसाहित्याचा विकास.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात बालकांसाठी जाणीवपूर्णक लेखनाला सुरूवात झाली. याच काळात लेखनाच्या शास्त्रशुद्ध घडणीकडे लक्ष दिले गेले. या साहित्याचे विविध प्रवाह वयोगटाप्रमाणे वृत्ती.प्रवृत्तीनुसार बालांच्या मानसिकतेचा विचार करून गुणांची प्रेरणा देणार साहित्य आढळते. 'समग्र साहित्य विश्व हे एखाद्या आधुनिक प्रजासत्ताकासारखे असून बालसाहित्य हा त्या प्रजास्ताकातील स्वायत्त इलाखा होय.'[४] कथा, कविता, कादंबरी, नाटक हे चार साहित्यप्रकार असले तरी प्रस्तुत निबंधात बालकादंबरीचा मागोवा या विवेचनात घेतला आहे. कादंबरी दिर्घ अवकाश असणारा वाङ्मयप्रकार आहे. मुलांचे वय आणि क्षमता लक्षात होवून याची रचना केलेली असते. अमरेंद्र गाडगीळ यांनी 'प्रवासी राम' मध्ये ध्येयवादी मुलांचे जीवन साकार केले आहे. ग. रा.वाळिंबे यांनी अद्भूतरम्यते वर भर देवून 'कॅप्टन प्रताप' (१९५०) नावाची कादंबरी लिहिली. महादेव शास्त्री जोशीची 'सुदर्शन' मध्ये दोन भावाची कथा सांगितली आहे. यदुनाथ थत्तेंची 'वाळवंटातील झरे' ही फाळणीवर आधारित कादंबरी आहे. मालतीबाई दांडेकरांच्या 'सुलेमानच्या खजिना' मधून धाडसी मुलांच्या विचारांना पंख देणारी कादंबरी आहे. ना.गो.शुक्ल, वसंत गोगल, सुमती पायगावकर, न. म.जोशी, शैलजा राजे, दत्ता टोळ, महावीर जोंधळे, सुधारक प्रभू.भा.रा. भागवत, लीलावती भागवत इ. यांनी बऱ्याच प्रमाणात ज्ञान, मनोरंजन, संस्कार करणे यावर त्यांनी भर दिलेला दिसतो. मराठी बालकादंबरी १८७५ नंतर बऱ्याच प्रमाणात लिहिली जावू लागली मुलांना कुटुंब, शाळा याशिवाय नवे अनुभवण्याची इच्छा, मुलांच्या वैचारिकतेला वाव देणाऱ्या, अन्यायाला वाचा फोडणारी वृत्ती,

अस्पृश्यता, अनाथ गरीब मुलांची कष्टाळू वृत्ती बालमजुरी करणारी मूले, मुलांच्या मनातील जिज्ञासूवृत्ती असे अनेक विषय बालकादंबरीतून प्रकट झालेले दिसतात.

## अपेक्षा.

आजही मराठी विपूल प्रमाणात बालसाहित्य लिहिले जाते. पण गांभीर्याने त्याकडे पाहिले जात नाही. बदलते समाजजीवन व परिस्थिती यांचा विचार होणे गरजेचे आहे. शंभर वर्षापुर्वीच्या काळ आठवता वाचन, श्रवण हीच आपल्या शिळोप्याची साधने होती. जीवनास गती नव्हती. यंत्रयुगाचा प्रादूर्भाव झाला तरी विकास झाला नव्हता. रस्ते सर्वत्र नव्हते. दळणवळणास गती नव्हती. बैलगाडी, सायकल, मोटार होती पण सार्वत्रिकता नव्हती. फोन, तार, रेल्वे इ. साधने होती पण शहरांपूरते त्यांचे क्षेत्र मर्यादित होते. खेडयापाडयात शाळा होत्या पण शिक्षण जागृती नव्हती सन १९६० नंतर जीवन बदलत जावून सन १९९० च्या दरम्यान झालेली संगणकक्रांती, जागतिकीकरण, उदारीकरण, खासगीकरण यामुळे जीवन गतीमय झाले. आर्थिक समृद्धी आली. मोबाईल, इंटरनेट उपग्रह क्रांतीने काळ, काम वेगाचे जूने गणित इतिहास जमा होवून 'क्षण ही सत्य' चे तत्वज्ञान उदयाला आले. चंगळवाद फोफावला जग जवळ आले. चलवलन वाढले. शिक्षण, अर्थ, समाज, राजकारण, सर्वजीवन व्यक्तिवादानी व्यक्तिस्वांतत्र्याने न्हाऊन निघाले. 'जीवनमुल्य' रजा घेवून वस्तू किंमत सर्वोपरी झाली. माणूसही वस्तू बनला. परिस्थितीनुरूप वाढता बुद्धांक लक्षात घेवून मुलांच्या मानसिकतेच्या विचार करून सकस लेखनकरणे अपेक्षित आहे. संस्काराच्या नावाखाली काहीतरी लादले जाते. त्यातून देशीयतेचा आशय स्पष्ट होत नसल्याने लेखकाचा मनोव्यापार बालवाचकाला भूरळ घालत नाही. याविषयी मंगेश पाडगावकर म्हणतात, 'मुलांच्या विश्वात जाताना मोठा असलेला लेखक स्वत:चे जग विसरू शकत नाही.' घरी आणि समाजात अनेक समस्यांची दिवसेंन दिवस भर पडत असल्याने त्यावर ठोस उपाययोजना करणे काळाची गरज आहे. सक्षम नेतृत्वाची, योग्य विचारसरणीची, समभावाची नितांत गरज असल्याचे दिसते.

## समारोप :

मराठी बालवाङ्मयाकडे पाहताना असे जाणवते आजही चढत्या क्रमाने साहित्यनिर्मिती होत असली तरी अपेक्षित अशा कलाकृतींची उणीवा भरून निघाली नाही. इंग्रजाच्या आगमाने झालेला क्रांतीकारक बदल महाराष्ट्रीयवासीयांना सहज अंगवळणी पडायला वेळ लागला. पोथ्या पुराणा सुरू असलेला साहित्य प्रवास बंदिस्त होता. बालकाला बोधामृत पाजणे हे ठाम गृहीत धरूनच काही देणे या न्यायातत्वाने साहित्य निर्माण केले गेले. बालसाहित्याचा प्रारंभबिंदू ठरवताना अनेक प्रश्नांचे निराकरण केले गेले नाही. बालसाहित्य संदर्भात या देशीवाणाची तपासणी होणे गरजेचे होते. पुर्वापार असलेली लोकसंस्कृतीला फाटा देत मुद्रणसंस्कृतीला आपलेसे करताना जे बालसाहित्य समोर आले ते बोधपर व उपदेश अशा स्वरूपाचे दिसते. बालसाहित्यातून त्यांची विशिष्ट भावावस्था, मनोवस्था, वाचक गृहित धरून लेखन करावे लागते. समाज ज्या वेगाने बदलतो आहे. त्या वेगाचे प्रतिबिंब साहित्यातून उमटणे ही काळाजी अत्यंत गरज आहे.

## संदर्भ टिपा :


१) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपादक), मराठी विश्वकोश खंड ५ (बंदा ते 'ब्वेनस एअरीझ') महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ १९८२ पृ.४६७

२) नलगे चंद्रकुमार, बालसाहित्य समीक्षा, कोल्हापूर २२ फेब्रुवारी २००६ पृ.४०

३) बागूल देवीदास, बालवाङ्मय, पृष्ट. ६

४) जाधव रा.ग., बालशिक्षण व बालसाहित्य, विविध आयाम : संपा मंदा खांडगे व लीला दीक्षित पृ.३४ व ३५





पाटील विजया पांडुरंग

पी.एच.डी.संशोधक विद्यार्थीनी , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.